# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २९.०५.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २८.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून ४१,६१०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०६ ईसमांवर कारवाई करून २,१७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४४३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०४,३००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) कळमना पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २०.०५.२०२६ चे १७.०० वा. ते दिनांक २२.०५.२०२६ चे ११.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. १५२६, गल्ली नं. २१, मिनीमाता नगर, कळमणा, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती निर्मला संतलाल पाल, वय ४५ वर्षे ह्या त्यांचे घराला कुलुप लावुन परिवारासह प्रतापगढ, उत्तरप्रदेश येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, घरात प्रवेश करून, देवघरातील आलमारीमधील सोन्या—चांदीचे दागिने किंमती ९३,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, कळमना पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी १) अश्विन लालताकुमार मिश्रा, वय १९ वर्षे, रा. धरमनगर, संत कबीर शाळेजवळ, कळमना, नागपुर २) हिमांशु सतिष मोरे, वय १९ वर्ष, रा. झोपडपट्टी, परमात्मा किराणा दुकान जवळ, भांडेवाडी, नागपूर यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद घरफोडीचा गुन्हा संगनमताने केल्याचे कबुली दिली. आरोपींना मुद्येमालाबाबत विचारणा केली असता, चोरी केलेला मुद्येमाल हा नमोकार ज्वेलर्स दुकानाचे मालक सराफा व्यापारी अभिषेक प्रकाश भरणे, वय ४५ वर्ष, रा. सुर्यनगर, प्लॉट क्र. २१९, कळमणा, नागपूर याचेकडे विक्री केल्याचे सांगितले. गुन्ह्यातील चोरी गेलेले सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने कि. ९३,०००/— रु. चा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (अति. कार्य. दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अण्णपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोनि. गुन्हे करीम खान पठान, पोउपनि. संतोषकुमार रामलोड, पोहवा. रविकुमार शाहू, प्रदीप पवार, पोअं. मंगेश लोही, संतोष पांडे, अनिल जाधव व प्रफुल गोहोकार यांनी केली.



**<u>३) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २८.०५.२०२६ चे २३.०० वा. ते दि. २९.०५.२०२६ चे ०१.३० वा. चे दरम्यान, यशोधरा नगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना टिपू सुलतान चौक, संघर्षनगर, प्लॉट क्र. १०४, नाल्याजवळ संशयास्पदरित्या तीन ईसम निळ्या जांभळ्या रंगाची बॅग घेऊन जातांना दिसून आले. त्यांचेजवळ जात असता, त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. यशोधरानगर पोलीसांनी त्यांचा पाठलाग करुन, तिन्ही ईसमांन ताब्यात घेतले. त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी आपले नावे १) सेनीगरम राकेश सेनीगरम कंकय्या, वय २३ वर्ष, रा. धम्माईगुडा, नागारम एक्स रोड, बवाची हॉटेल मागे, पोलीस ठाणे व जिल्हा वारंगल, तेलंगणा, २) रितीश कालेरु राजू कालेरु, वय १९ वर्ष, रा. चिलकानगर, श्रीनिवास अपार्टमेंट, फ्लॅट क्र. २६, पोलीस ठाणे जवाहरनगर, जिल्हा रंगारेड्डी, राज्य तेलंगाना, ३) बिजलीपूर चरण बिजलीपूर रमेश, वय २५ वर्ष, रा. बलरामनगर, राफेलगुडा, लुनाफिट डान्स स्टुडीओ जवळ, जिल्हा सिकंदराबाद, तेलंगाना, असे सांगितले. पंचासमक्ष त्यांचेजवळील बॅगची पाहणी केली असता, त्यामध्ये एका नारंगी पांढरे रंगाचे कापडी पिशवीत लहान लहान प्लास्टीक पन्नीमध्ये ओलसर हिरवट झाडपत्ती व बिया तसेच उग्र वास येणारा अंमली पदार्थ गांजा वजनी ११३० ग्राम मिळून आला. आरोपींना गांजाबाबत विचारणा केली असता, नमुद मुद्येमाल हा पाहिजे आरोपी नामे शेख शाहरुख, वय अंदाजे ३० वर्ष, रा. यशोधरानगर, नागपूर याचेकडून खरेदी केल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातून गांजा, मोबाईल फोन व बॅग असा एकुण ३५,९५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा खरेदी विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे

यशोधरनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरापीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (अति. कार्य. दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अण्णपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. संदीप बुआ, पोनि. गुन्हे देवाजी नरोटे, पोउपनि. सदाशिव कणसे, अनंत पाटील पोहवा. प्रशांत कोडापे, पोअं. प्रविण जाधव, पकंज जाधव, राहुल इंगोले, साजीद खान, सन्नी मतेल, राकेश तिडके, दिग्विजय वेरुळकर व योगेश ईप्पर यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे नवीन कामठी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २८.०५.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, नवीन कामठी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, शेख जावेद वल्द युनूस मोहम्मद यांचे घरासमोर, कामगार नगर, कामठी, नागपूर येथे गोवंशीय जनावरांना कत्तलीकरीता बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे एकुण ०५ गोवंशीय लहान मोठे जनावरांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले दिसून आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत चौकशी केली असता, आरोपी १) सोहेल अहमद अंसारी, वय २५ वर्ष, रा. पारशीपुरा मैदान, सार्वजनिक विहीरीजवळ, कामगार नगर, कामठी, नागपुर व २) शेख जावेद वल्द युनूस मोहम्मद, वय २५ वर्ष, रा. कामगार नगर, कामठी यांची असुन, त्यांनी नमुद जनावरांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ०५ गोवंशीय जनावरे एकुण किंमती अंदाजे ४५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गोशाळा कामठी येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे नवीन कामठी येथे मपोउपनि. सृष्टी कदम यांनी आरोपीविरूध्द कलम ५,५(ब),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१), ११(१)(फ), ११(१)(ह), ११(१)(आय) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी क्र. १ यास अटक करण्यात आली असून, पाहीजे आरोपी क्र. २ चा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे धंतोली :—** दिनांक २८.०५.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, वर्धा रोडवरील लोकमत चौक ते पंचशील चौक दरम्यान, शहीद गोवारी उडाणपुलाखाली, एचडीएफसी बॅकसमोरील डिव्हायडरवर एक अनोळखी पुरूष ईसम अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचे, रंग—निमगोरा, बांधा—मध्यम, डोक्याचे केस—काळे व लांब, दाढी—वाढलेली, अंगात मेहरुन रंगाची टि—शर्ट व ग्रे रंगाची जिन्स पॅन्ट घातलेल्या वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल नेले असता, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतक इसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे धंतोली येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी शुभम दिलीप सोनटक्के, वय ३० वर्ष, रा. सरस्वती नगर, तकीया, धंतोली, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे धंतोली येथे मपोउपनि. मिरा सोनुने यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सक्करदरा :—** दिनांक २८.०५.२०२६ चे १८.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, बॉलीवूड सेंटरचे समोरील हॅप्पीनेस कॉर्नर हॉटेलचे समोर रोडवर एक अनोळखी पुरूष ईसम अंदाजे ६५ ते ७० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल नेले असता, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यांप्रकरणी फिर्यादी चंद्रेशेखर देवाजी ठाकरे, वय २७ वर्ष, रा. प्लॉट क्र. २३८, रानी भोसले नगर, भांडेप्लॉट, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. देवानंद मोरे ८६०५०१९७४८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे पारडी :—** सुनिल विजय चौधरी, वय २६ वर्ष, रा. धकाते यांचे घरी किरायाने, भवानी नगर, पारडी, नागपूर हे दिनांक २१.०५.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची—५ फुट ३ इंच, केस—काळे, अंगात— तपकीरी रंगाचा शर्ट व तपकिरी रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— गळ्यावर गोंदण असून, उजवे कानात बाळी घातलेली आहे.



सुनिल

**स्वा/—**

**( राहुल रोटे )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**